## Washim District Police

**Nature of work** **:-** Raid On Cricket Match Betting

**Police Station** **:-** Local Crime Branch, Washim

**Date of Good Work Done :- 17 May 2017**

**Brief of the work done :-**

On the information of District Superintendent of Police, Washim Smt. Mokshada Patil a special team led by API Kiran Salve acted upon it swiftly & conducted raid at Sudagarpura, Washim at west of Madhyameshwar Temple, in the newly constructed building of Faraim Bhai Ismail Bhai and arrested accused 1) Kailas Sanjaykumar Basantvani age 21yr. at Sindhi Colony, Washim, 2) Ankit Ashok Varma age 27 yr. at Guruwar bazar, Washim, 3) Amit Manoj Rupchandani age 21 yr. at Sindhi Colony, Washim, 4) Rahul Jayant Paraswani age 25 yr. at Sindhi colony, Washim, 5) Azahar Ahemad Maksud Ahemad age 43 yr. at Pathanpura, Washim While they were indulging in IPL Cricket match betting in the presence of Panchas & Seized 1) Cash Rs. 49,250/- 2) Ten mobile phones 3) T.V., Monitor, Set top Box 4) Cooler 5) Two Motor Cycles & other things total worth Rs. 3,64,050 /-.

District Superintendent of Police, Washim Smt. Mokshada Patil formed a special team led by API Kiran Salve consisting of ASI Katade, HC Nandkule, Chavan, Sarnaik, Bhoyar, NPC Vyawhare, PC Shelke, Gharat, Rathod, Barve, DPC Nirmal has been continuesouly in action & raided various illegal dens which resulted into a good reaction among the people of district Washim.

The initiative of District Superintendent of Police, Washim Smt. Mokshada Patil indicates to eradication of illegal dens comes in a true form.

**Image :-**

# आयपीएल सट्ट्यावर धाड; ३.६४ लाखांचा मुद्देमाल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई : पाच आरोपी जेरबंद

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम** : गुन्हेगारीवर वचक मिळविण्याकरिता गठित करण्यात आलेले विशेष पथक व स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी मिळालेल्या गुप्त माहितीवरुन वाशिममधील सौदागरपुरा परिसरात आयपीएल क्रिकेट सट्ट्यावर धाड टाकली. यावेळी क्रिकेटवर जुगार खेळणाऱ्या पाच आरोपींना जेरबंद करून ३ लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई १७ मे रोजी सायंकाळी करण्यात आली.

वाशिम शहरात आयपीएल क्रिकेटवर जुगार खेळविला जात असल्याची माहिती मिळाल्यावरुन पोलीस अधीक्षक मोक्षदा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक किरण साळवे



यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी सौदागरपुरा परिसरात फराईमभाई इस्माईलभाई यांच्या नवीन बांधकाम असलेल्या इमारतीत वाशिम येथील कैलास बसंतवाणी व अंकित वर्मा हे आयपीएलमधील हैदराबादविरुद्ध कोलकाता नाइट राइडर्स या क्रिकेट मॅचवर टी.व्ही. मॉनिटरवर केबल लावून मोबाइल फोनद्वारे पैशाची बेटिंग लावून जुगार खेळत व खेळविताना आढळून आले. यावेळी पंचासमक्ष आरोपी कैलास संजयकुमार बसंतवाणी (वय २१, रा.सिंधी कॉलनी, वाशिम), अंकित अशोक वर्मा (वय २७, रा.गुरुवार बाजार, वाशिम), अमीत मनोज रुपचंदाणी (वय २१, रा.सिंधी कॉलनी, वाशिम), राहुल जयंत पारसवाणी (वय २५, रा.सिंधी कॉलनी वाशिम), अजहर अहमद मकसूद अहमद (वय ४३, रा.पठाणपुरा, वाशिम) यांना अटक करुन रोख रक्कम ४९ हजार २५०, १० मोबाइल संच, टी.व्ही. मॉनिटर, सेटअप बॉक्स, कुलर, मोटारसायकल व इतर साहित्य, असा एकूण ३ लाख ६४ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईत विशेष पथकातील सहायक पोलीस उपनिरीक्षक कातडे, पोहकाँ नंदकुले, चव्हाण, सरनाईक, भोयर, व्यवहारे, पो.काँ. शेळके, घरत, राठोड, बर्वे, चालक निर्मल आर्दीनी सहभाग घेतला.